# MAHARASHTRA POLLUTION CONTROL BOARD

Phone No. 24010437 / 24020781
Visit us at : http://mpcb.gov.in
Email : jdwaterdivision@mpcb.gov.in

Kalptaru Point 2nd floor,
Sion Matunga Scheme Road
No. 8, Infant of Sion Cercal,
Sion (E), Mumbai – 400 022.

**"Your Service is our Duty"**

No./MPCB/JD(WPC)/ENV/PH/B- 240709 - FTS - 0047 Date: 09/ 07 / 2024

**To,**
**The Principal Secretary,**
**Environment & Climate Change Department.**
**Government of Maharashtra,**
**Room No. 217 (Annex) New Administration Building,**
**Mantralaya, Mumbai-400032.**

**Sub:** Environmental Clearance - Proceedings of Public Hearing in respect of **Proposed** 29 Sand Mining projects. **Proposed by** District Mining Officer, Mining Department, Collector Office, Buldhana, Maharashtra.

**Ref:** Sub-Regional Office Akola submitted proceeding vide dt-19.06.2024 received on 24.06.2024.

**Sir,**

The Public Hearing for **Proposed** 29 Sand Mining projects. **Proposed by** District Mining Officer, Mining Department, Collector Office, Buldhana, Maharashtra.

Environmental public hearing Conducted on dtd-19.06.2024, Time-12.00. Noon., At Collector Sabhagruh, Collector Office, Buldhana, Maharashtra, The minutes of the public hearing approved and duly signed by the Public hearing panel along with the proceedings are enclosed

a. Minutes of public hearing duly signed by the Chairman of public hearing panel in (English & Marathi)
b. Copy of Office Order
c. Video DVD and Photograph of Public Hearing.
d. List of participants.
e. Newspaper Notices for Environmental Public Hearing in English & Marathi.

This is submitted for further necessary action please.

**Yours Sincerely,**

9/7

**Dr.J.B.Sangewar**
**Joint Director (WPC)**

**Encl: As above**
**Copy submitted for Information to:**
The Member Secretary, MPCB, Mumbai.
**Copy for information & necessary action to:**
1) The Regional Officer, MPCB, Amravati
2) The Sub Regional Office, MPCB, Akola.
3) EIC, M.P. C. Board, Mumbai - For information & display of Minutes on website.
**Copy to the applicant of the project:**
District Mining Officer, Mining Department, Collector Office, Buldhana, Maharashtra.

**जिल्हा खनिकर्म अधिकारी, खनिकर्म विभाग, बुलढाणा यांचेकडून प्राप्त झालेल्या बुलढाणा जिल्हयातील 29 रेतीघाटांच्या प्रस्तावाबाबत दि. 19.06.2024 रोजी जिल्हाधिकारी कार्यालय, बुलढाणा येथे दुपारी 12.00 वाजता घेण्यात आलेल्या पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणीचे इतिवृत्त**

---------------

जिल्हा खनिकर्म अधिकारी, खनिकर्म विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय, बुलढाणा यांचेकडून बुलढाणा जिल्हयातील 29 रेतीघाटांचे प्रस्ताव, पर्यावरणीय अनुमती प्राप्त करण्याकरीता पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी घेण्याबाबत महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळास प्राप्त झाले. केंद्रीय वने व पर्यावरण मंत्रालय (केंद्रीय पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्रालय) यांचे दि. 14.09.2006 च्या अधिसुचनेतील तरतुदीनुसार सदर लोकसुनावणी आयोजीत करण्यात आली होती. त्या अनुषंगाने सदर जाहीर लोकसुनावणी दि. 19.06.2024 रोजी दुपारी 12.00 वाजता जिल्हाधिकारी कार्यालय, बुलढाणा येथे पर्यावरण, वने व वातावरणीय बदल मंत्रालय, आधात मुल्यांकन विभाग, नवी दिल्ली यांचे दि. 09 जुन 2021 रोजीचे ऑफिस मेमोरेन्डम मधील तरतुदी नुसार घेण्यात आली. सदर जाहिर लोकसुनावणीकरीता मा. सदस्य सचिव म.प्र.नि. मंडळ अमरावती यांनी आदेश क्र. E-139 of 2024 पत्र क्र. BO/JD(WPC)/PH/B-240607-FTS-0154 दि. 07.06.2024 अन्वये लोकसुनावणी समीती गठन आदेश पारीत केलेला आहे.

सदर जाहिर लोकसुनावणीस खालीलप्रमाणे जाहिर लोकसुनावणी समितीचे सदस्य उपस्थितीत होते.

१. मा. डॉ. किरण पाटील, जिल्हाधिकारी, बुलढाणा — अध्यक्ष
२. श्री संजय दे. पाटील, प्रादेशिक अधिकारी म.प्र.नि. मंडळ, अमरावती —सदस्य
३. श्री.महेश दे. भिवापुरकर, उप-प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, अकोला —आयोजक

सदर जाहिर लोकसुनावणी बाबतची सुचना दैनिक लोकमत (मराठी) व दैनिक हितवाद (इंग्रजी) या वृत्तपत्रामध्ये दि. 14.05.2024 रोजी प्रसिध्द करण्यात आली होती. त्या अनुषंगाने सदर जाहिर लोकसुनावणी दि. 19.06.2024 रोजी घेण्यात आली.

मा. अध्यक्ष पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी अध्यक्ष तथा जिल्हाधिकारी मा. डॉ. किरण पाटील यांचे परवानगीने लोकसुनावणी सुरू करण्यात आली. सर्वप्रथम लोकसुनावणी समितीचे आयोजक श्री. महेश दे. भिवापुरकर, उप-प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ अकोला यांनी सर्व उपस्थितीतांचे स्वागत करून प्रास्ताविक केले.

बुलढाणा जिल्हयातील 29 रेतीघाटांबाबत जिल्हा खनिकर्म अधिकारी बुलढाणा यांनी सादर केलेले पर्यावरण व्यवस्थापन आराखडा (ईएमपी), कार्यकारी सारांश (इंग्रजी व मराठी) परीसरातील नागरीकांना/गावक-यांना/संबंधीत पर्यावरण क्षेत्रात काम करणा-या संस्थाना अवलोकनार्थ खालील ठिकाणी ठेवण्यात आलेले होते.

1. महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, कल्पतरू पॉईट, 2 रा व 4 था माळा, सिनेप्लानेट सिनेमासमोर, सायन सर्कलजवळ, (पु.) मुंबई-400022.
2. प्रादेशिक कार्यालय, अमरावती, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, सहकार सुरभी विवेकानंद कॉलनीजवळ, बापटवाडी, अमरावती-444606.
3. उपप्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, हुतात्मा चौक, नेहरू पार्क जवळ, अकोला.
4. जिल्हाधिकारी कार्यालय, बुलढाणा, जिल्हा परिषद, बुलढाणा, जिल्हा उद्योग केंद्र, बुलढाणा.
5. जिल्हयातील सर्व उपविभागीय कार्यालये, सर्व तहसील कार्यालये सर्व पंचायत समिती कार्यालये व संबंधित ग्रामपंचायत कार्यालये, जि. बुलढाणा.

श्री. महेश दे. भिवापुरकर, उप-प्रादेशिक अधिकारी, अकोला तसेच आयोजक जाहिर पर्यावरण विषयक लोकसुनावणी समिती यांनी प्रकल्प समन्वयक यांना रेतीघाट प्रकल्पाबाबत सादरीकरण करण्याची विनंती केली. त्यानंतर प्रकल्प समन्वयक यांचे वतीने मंत्राज ग्रीन रिसोर्सेस लि., नाशिक यांचे प्रतिनिधी यांनी रेतीघाट प्रकल्पाबाबत सादरीकरण दिले.

त्यामधे त्यांनी सांगीतले की, वाहतुकीसाठी वापरल्या जाणा-या कच्च्या रस्त्यांवर नियमीतपणे पाणी फवारले जाईल. वाळू वाहतुक करणारे वाहन ताडपत्रीने झाकले जाईल. खोदकाम आणि वाळु वाहतुक केवळ दिवसाच्या वेळीच केली जाईल. वाळु उत्खनन केवळ कोरडया नदीच्या पात्रातच केले जाईल. पावसाळा व पुर दरम्यान खोदकाम बंद केले जाईल. खोदकाम अनुमती काढलेल्या क्षमतेपेक्षा जास्त होणार नाही. ग्रामपंचायतीने शिफारस केल्यानुसार मुख्यत: रस्त्याच्या कडेला व नदीच्या काठी किंवा येण्या जाण्याच्या रस्त्याच्या बाजुने वृक्षारोपन केले जाईल. या प्रकल्पामुळे स्थानिक लोकांना रोजगार मिळेल. लोकांची सामाजिक आर्थिक परिस्थीती सुधारेल. आरोग्य सुविधा पुरविल्या जातील. नियमीत वैदयकिय शिबीरे आणि वैदयकिय सुविधा देण्यात येईल.

श्री. महेश दे. भिवापुरकर, उप-प्रादेशिक अधिकारी, अकोला तसेच आयोजक जाहिर पर्यावरण विषयक लोकसुनावणी समिती यांनी सांगीतले की, सदर रेती घाटांच्या प्रकल्पाबाबत महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळास लेखी स्वरूपात सुचना/आक्षेप प्राप्त झालेले नाही. त्यांनी सदर प्रस्तावाबाबत उपस्थितीतांच्या काही सुचना/आक्षेप असल्यास त्याप्रमाणे मांडावेत अशी विनंती उपस्थितीतांना केली.

श्री रामेश्वर चाटे, सरपंच, निमगाव यांनी प्रश्न केला की, पर्यावरण मान्यता रदद झाल्यापासून अवैध धंदे जास्त प्रमाणात झाले आहेत. यावर काय उपाययोजना करण्यात येवू शकते.

याबाबत मा. अध्यक्ष यांनी सांगीतले की, सदर 29 रेतीघाटांचा प्रस्ताव आजच महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुख्यालय, मुंबई येथे पूढील कार्यवाही करीता पाठविण्यात येईल. पर्यावरणीय अनुमती प्राप्त करण्याकरीता पर्यावरण विभाग मुंबई येथे समिती सुदधा गठीत करण्यात आलेली आहे. तसेच जिल्हयामधे अवैध उत्खनन वाहतुकीस प्रतिबंध करण्याकरीता भरारी पथके गठीत करण्यात आली आहेत व त्यांच्याद्वारे कारवाई करण्यात येते. सदर समीतीच्या बैठकीमधे पर्यावरण अनुमती प्राप्त करण्याकरीता प्रस्ताव विचारात घेतले जातील. जुन ते ऑक्टोबर महिन्यादरम्यान पाऊस व नदीपात्रामधे पाणी असल्यामुळे रेतीचे उत्खनन करण्यात येत नाही. तसेच माहे ऑक्टोबर नंतर रेती उत्खनन सुरू होईल. त्यांनी पूढे आवाहन केले की, सर्व ठेकेदारांनी निविदा प्रक्रियेमध्ये सहभाग नोंदवावा.

श्री अंकुश देशमुख, मौजे टाकरखेड भा., यांनी प्रश्न उपस्थित केला की, रेतीघाटाची पर्यावरण मान्यता संपलेली आहे. याबाबत काय उपाय योजना करता येतील.

याबाबत मा. अध्यक्ष यांनी सांगीतले की, सदर 29 रेतीघाटांचा तीन वर्षासाठीचा खाणकाम आराखडा तयार करण्यात आला आहे. आजच्या जनसुनावणी नंतर सदर प्रस्ताव आजच महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुख्यालय, मुंबई येथे पूढील कार्यवाही साठी प्रस्ताव पाठविण्यात येईल. यापूर्वी 12 रेती घाटासाठी मान्यतेचा प्रस्ताव पर्यावरण विभागास सादर करण्यात आलेला आहे.

श्री रामेश्वर चाटे, सरपंच, निमगाव यांनी प्रश्न केला की, वृक्षलागवड प्रशासना मार्फत करण्यात येणार आहे काय?

याबाबत मा. अध्यक्ष यांनी सांगीतले की, वृक्षलागवडीमधे सर्वाचा सहभाग महत्वाचा आहे. यावर्षी जुलै महिन्यापासून जिल्हयामधे 4 ते 5 लक्ष वृक्षलागवडीचे निश्चित केले आहे. तसेच संबधीत ग्रामपंचातीकडे जागा शिल्लक असल्यास त्यांनी वृक्षरोपनासाठी नोंदणी करावी. सामाजिक वनिकरण विभागामार्फत वृक्ष लागवडीकरीता वृक्ष पूरविले जातील.

श्री उमाकांत पराड, दिग्रस यांनी प्रश्न केला की, रेती घाटावर जाण्यासाठी योग्य रस्ते नाहीत.

याबाबत मा. अध्यक्ष यांनी सांगीतले की, ज्या काही अडचणी येतील त्यावर सर्वांच्या एकत्रीत सहभागातुन काम केले जाईल व सर्व प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न करण्यात येईल.

श्री उमाकांत पराड, दिग्रस यांनी प्रश्न केला की, अवकाळी पावसामुळे रेती घाटावर गाळ जमा होतो. त्यावर काय उपाययोजना करता येईल. रेती उत्खननसाठी काही बदल करता येतील काय?

याबाबत मा. अध्यक्ष यांनी सांगीतले की, सर्व बाबींचा विचार करूनच रेतीघाट प्रस्तावित करण्यात येतात त्यामुळे रेती उत्खननासाठी बदल करणे शक्य होणार नाही.

मा. अध्यक्षांचे परवानगीने उपस्थितांचे आभार मानुन सदर जाहीर लोकसुनावणी संपन्न झाल्याचे जाहीर करण्यात आले.

| | | |
|---|---|---|
| (म.दे.भिवापुरकर) | (सं. दे. पाटील) | (डॉ. किरण पाटील) |
| आयोजक | सदस्य | अध्यक्ष लोकसुनावणी समिती |
| तथा | तथा | तथा |
| उप प्रादेशिक अधिकारी | प्रादेशिक अधिकारी | अप्पर जिल्हाधिकारी, बुलढाणा |
| अकोला | अमरावती | |